www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६९ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१९ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# 'चारसो पार'मध्ये चंद्रपूरचाही समावेश राहणार

# ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## उपराजधानीत सुधीरभाऊ आप आगे बढो हम तुम्हारे साथ है गजरात दुमदुमला विमानतळ परिसर

**चंद्रपूर– चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा मतदारसंघातील जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा आशीर्वाद माझ्यासोबत सोबत आहे. आज कार्यकर्त्यांचा उत्साह बघून, देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीएच्या 'अब की बार चारसो पार'मध्ये आपल्या मतदार संघाचाही समावेश असणार आहे, याची खात्री पटली आहे, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूर–वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्सुधीर मुनगंटीवार यांनी (सोमवार) येथे व्यक्त केला.**

## नागपूर,खांबाडा,वरोरा,टेंभुर्डा येथे जल्लोषात भव्य स्वागत







## भद्रावती येथे जेसीबीतून फुलांची उधळण

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आज प्रथम आगमन झाले. दुपारी साडेबाराच्या सुमारात नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले तेव्हा शेकडो कार्यकर्ते आणि चाहत्यांनी त्यांचे ढोलताशाच्या गजरात जल्लोषात स्वागत केले. यावेळी 'सुधीर भाऊ आप आगे बढो हम तुम्हारे साथ है' अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. नागपूर विमानतळावर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजीव रेड्डी बोदगुलवार, संदीप धूर्वे, भाजपा ज्येष्ठ नेते चंदन सिंग चंदेल, भाजपचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष राजू कक्कड, देवराव भोंगळे, अण्णासाहेब पारवेकर, आनंद वैद्य पांढरकवढा, घाटंजी तालुका अध्यक्ष डहाके, घाटंजी महामंत्री हितेश परचाके, रवी बेलूरकर आदींची यावेळी उपस्थिती होती.नागपूर ते चंद्रपूर या प्रवासात जागोजागी त्यांचे स्वागत झाले. ना. सुधीर मुनगंटीवार यांनी नागपूर विमानतळावर पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'गेल्या तीस वर्षांपासून राज्य शासनाशी संबंधित प्रश्न मांडण्याची आणि मंत्री म्हणून प्रश्न सोडविण्याची संधी मला मिळाली. आता केंद्र सरकारशी संबंधित प्रश्न सोडविण्याची संधी मिळणार आहे, त्याबद्दल देशगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांचे आभार मानतो. ज्या नवीन संसद भवनाच्या (सेंट्रल व्हिस्टा) बांधकामासाठी माझ्या मतदारसंघातील सागवान काष्ठ पाठवले, त्याच दरवाज्यातून संसद भवनात प्रवेश करण्याचा योग येणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. आजवर केवळ जनतेच्या सेवेसाठी निवडणुक लढलो आणि आत्ताही जनतेची सेवा करण्यासाठीच लढणार आहे. कारण माझे ध्येय सामान्य माणसाची सेवा करणे एवढेच राहिले आहे. कोणत्याही पदावर असलो तरीही मी जीव ओतून काम करतो.' नागपूर येथे विमानतळावर दमदार स्वागत झाल्यानंतर ना. सुधीर मुनगंटीवार चंद्रपूरच्या दिशेने निघाले. चंद्रपूर मार्गावर अनके गावांमध्ये त्यांचे स्वागत करण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सज्ज होते. खांबाडा येथे वरोरा विधानसभेचे प्रमुख रमेश राजुरकर, भाजपा ओबीसी सेलचे जिल्हा अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी स्वागत केले. टेंमुर्डा येथे माजी जिल्हा परिषद सभापती राजू गायकवाड यांनी ना. श् सुधीर मुनगंटीवार यांचे जल्लोषात स्वागत करून शुभेच्छा दिल्या. वरोरा येथे ना. मुनगंटीवार यांचे रमेश राजुरकर, करण देवतळे व अहेतेश्याम अली, डॉ अंकुश आगलावे, डॉ सागर वझे, राष्ट्रवादी कॉंग्रेस चे विलास नेरकर, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन मत्ते यांनी भव्य स्वागत केले .यावेळी मोठ्या संख्येने पक्षप्रवेश देखील झाला. भद्रावती येथे जेसीबिद्वारे फुलांची उधळण करत भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी चंद्रकांत गुंडावार, अमित गुंडावार, विजय पिदुरकर, प्रवीण ठेंगणे, गोपाल गोस्वाडे आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## मोदीसारखी आमची जुमलेबाजी व फेकूगिरी नाही

# चंद्रशेखर बानवकुळे हेच मुळात सिनेमातील विनोदी पात्र-नाना पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवाजी पार्कवरील भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या ऐतिहासीक सभेने एक नवा इतिहास रचला आहे. इंडिया आघाडीच्या देशभरातील नेत्यांच्या उपस्थितीत या सभेला 'जनसागर' लोटला होता. शिवाजी पार्कवरील सभेने भाजपाला आपला पराभव समोर दिसू लागला आहे त्यामुळे नैराश्येतून चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दरेकर यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत सारख्यांना धडकी भरली आहे. शिवाजी पार्कवरील सभेने 'मोदानी' सरकारच्या अंताची सुरुवात झाल्याने, त्यांची झोप उडाली आहे, असे सडेतोड प्रत्युत्तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे.



शिवाजी पार्कवरील सभा व राहुल गांधी यांच्यावर टीका करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत नाना पटोले पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी सर्वात मोठे खंडणी वसुलीचे रॅकेट चालवतात या राहुल गांधी यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याची धमक आधी भाजपाने दाखवावी. शिवाजी पार्कवरील सभेने देशात परिवर्तनाचा संकेत दिला आहे हे स्पष्ट असून पराभवाच्या भितीपोटी भाजपा व गद्दारसेनेचे लाचार या सभेवर अनावश्यक टीका करत आहेत. उद्धव ठाकरेंनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर सरकार स्थापन केल्यापासून भाजपाला पोटशूळ उठला आहे. 'हिंदुत्व खतरे में' अशी कोल्हेकुई भाजपाचे नेते करत असतात व त्यांच्याच सुरात सुर मिसळून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे री ओढत असतात. भाजपाने देशभरातील विविध राज्यात राजकीय तडजोडी केल्या, काश्मीरमध्ये मेहबुबा मुफ्ती यांच्या पक्षासोबत सरकार स्थापन करून भाजपाने दीड दोन वर्ष संसार केला तेंव्हा यांचे 'हिंदुत्व खतरे में' आले नाही का? बाळासाहेबांचा एखादा व्हिडिओ दाखवून ते काँग्रेस विरोधी होते हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व काँग्रेसच संबंध लपून राहिलेले नाहीत. बाळासाहेबांनीच काँग्रेसप्रणित युपीए सरकारच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार प्रतिभाताई पाटील व प्रणव मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता, याची माहिती कदाचित या लोकांना नसावी किंवा त्यांना विसरण्याचा रोग जडला असावा त्यामुळे या मंडळींनी उगाच बोंबाबोंब करु नये.शिवाजी पार्कवरील सभेला गर्दी नव्हती, हास्यजत्रा होती अशी बाष्कळ बडबड करणाऱ्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभेची गर्दी पाहण्यासाठी मोठ्या भिंगाचा चष्मा वापरुन पहावे. मोदींच्या सभेला भाडोत्री गर्दी कशी जमावावी लागली, हे यवतमाळच्या सभेने अख्या महाराष्ट्रानेही पाहिले आहे. चंद्रशेखर बावनकुळे हेच एक 'विनोदीपात्र' आहेत आणि भाजपात बावनकुळेंची काय किंमत आहे, हे विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्यावरून दिसले आहे. ज्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षाला उमेदवारीही मिळत नाही, यावरुन पक्षातील त्यांची किंमत काय, हे कळते.

## राहुल गांधींची सभा म्हणजे फॅमिली गॅदरिंग

# 'आप की बार तडीपार'चा नारा देणाऱ्यांनाच लोकांनी तडीपार केले-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईत इंडिया आघाडीची काल झालेली जी सभा ती एक प्रकारे फॅमिली गॅदरिंग होती. 'आपकी बार तडीपार' म्हणणाऱ्यांना लोकांनी आधीच तडीपार केलेले आहे. सभेत आलेल्या नेत्यांना त्यांच्या राज्यातील लोकांनी देखील तडीपार केलेले आहे. स्टॅलिन यांनी हिंदूधर्माचा अपमान केला, राहुल गांधी यांनी सावरकरांचा अपमान केला, अशा लोकांसोबत बसण्याची वेळ काही लोकांवर आली, ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.



मुख्यमंत्री शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, काल राहुल गांधी यांच्या सभेचे चित्र एका म्हणी प्रमाणे होते. असे म्हणतात की, 'कही से इथे, कही से रोडे, भानुमती का कुणबा' या म्हणी प्रमाणे नैराश्य चेहऱ्यावर असलेले लोक, कोणी बिहार, उत्तरप्रदेश, कोणी काश्मीरमधून जे तडीपार झालेले व हद्दपार लोकांनी केले ते लोक एकत्र आलेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर काल सरळ सरळ दिसत होते. म्हणून कालचा दिवस हा काळाचा दिवस आहे, असेच आम्ही म्हणतो.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विश्वास गमावलेला विरोधीपक्ष काल सभेत दिसून आला. त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. त्यांच्याकडे कोणतीही नीती, अजेंडा नाही केवळ मोदींचा व्यक्तीद्वेष दिसून आला. विरोधकांकडे पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून चेहरा नाही साधा उमेदवार देखील ते जाहीर करू शक्त नाही. केवळ एकमेकांकडे पाहतात. त्यांच्याकडे कोणताही विश्वास राहिलेला नाही. विश्वास गमावलेल्या लोकांचे भविष्य आहे तरी काय, असा हल्लाबोल शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या सभेतील नेत्यांवर केला.जर देशात लोकशाही नसती तर राहुल गांधी काल मुंबईत सभा घेऊन मोदींविरोधात बोलू शकले असते का? पण केवळ लोकशाही वाचविण्याच्या बाता केल्या जातात. पण देशात मजबूत लोकशाही आहे, हे देखील विरोधकांनी समजून घेतले पाहिजे, असा सल्ला देखील शिंदे यांनी विरोधकांना दिला.उबाठा गटाच्या लोकांनी काल बाळासाहेबांच्या अन् स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुढे नतमस्तक होऊन माफी मागितली पाहिजे. उद्धव ठाकरेंना जर काल ५ मिनिटं बोलायला दिलेले असतील तर त्यांची पत दिसून आलेली आहे. कारण त्यांच्याकडे पक्ष नाही, आमदार नाही, खासदार नाही. जेवढा त्यांचा पक्ष तेवढीच त्यांची पत काल दाखवून दिली गेली आहे. असा हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, उद्धव ठाकरे आपल्या भाषणाची सुरुवात नेहमी, 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो आणि भगिनींनो' करतात. पण कालच्या सभेत उद्धव ठाकरे यांनी हिंदू हा शब्द उच्चारला नाही. यावरुन लक्षात आलं की, उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, त्यांचं धोरण आणि विचारधारा सोडून दिली आहे. त्यामुळेच आम्हाला त्यांची साथ सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला. काल उद्धव ठाकरे यांनी, 'अब की बार भाजपा तडीपार' अशी घोषणा दिली. पण उद्धव ठाकरे यांनाच महाराष्ट्रातील शिवसैनिकांनी आणि जनतेने तडीपार केले आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

# निवडणुकीच्या तयारीसंदर्भात नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा;जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व यंत्रणेला सुचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. १३ – चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होणार आहे. या अनुषंगाने जिल्हास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सर्व नोडल अधिका–यांच्या कामकाजाचा आढावा घेतला

नियोजन भवन येथे बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांच्यासह सहा. निवडणूक अधिकारी, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार व इतर विभागाचे विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्ह्यात १७ विषयांसाठी नोडल अधिका–यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या सहकार्यासाठी इतरही अधिकारी नियुक्त करण्यात आले असून प्रत्येकाने आपापली जबाबदारी गांभियाने पार पाडावी. निवडणूक हा कालबध्द कार्यक्रम असून चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्याच टप्प्यात आहे. त्यामुळे प्रत्येकाने सुक्ष्म नियोजन करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे वाचन करणे आवश्यक आहे. त्यानुसारच



काम करणे अपेक्षित आहे. यात वेळी कोणताही हलगर्जीपणा चालणार नाही. काही शंका असल्यास त्या विचारून घ्याव्यात.पुढे जिल्हाधिकारी म्हणाले, सर्व सहायक निवडणूक अधिका–यांनी आपापल्या विधानसभा क्षेत्रातील स्ट्राँग रुमची पाहणी करावी. तेथील बंदोबस्त, सीसीटीव्ही कॅमेरे, स्ट्राँगरुमची सुरक्षितता आदी बाबी तपासून घ्याव्यात. तसेच आपापल्या क्षेत्रातील फिरते निगराणी पथक (एफ.एस.टी.), स्थायी निगराणी पथक (एस.एस.टी.), व्हीडीओ निगराणी पथक (व्ही.व्ही.टी.), व्हिडीओ पाहणी पथक (व्ही.एस.टी.) त्वरीत कार्यान्वित करून पथकांच्या पॉईंटवर भेट द्यावी. सोबतच आपल्या कार्यक्षेत्रात विविध परवानग्यांसाठी एक खिडकी योजना आणि नियंत्रण कक्ष स्थापन करावा. पोलिंग पार्टीचे प्रशिक्षण अतिशय गांभिर्याने घ्यावे, जेणकरून मतदानाच्यावेळी कोणत्याही चुका होऊ नये. मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा जसे, पिण्याचे पाणी, शौचालय, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची आणि व्हीलचेअरची व्यवस्था करावी, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.यावेळी प्रत्येक नोडल अधिका–यांनी आपापल्या कामकाजाचे सादरीकरण केले.

# केरुनाना छत्रे ऊर्फ विनायक लक्ष्मण छत्रे!

**विनायक लक्ष्मण ऊर्फ केरुनाना छत्रे हे प्राचीन भारतीय तसेच आधुनिक गणित व खगोलशास्त्र यांचे अभ्यासक होते. विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांचे ते गुरू होते. केजीएन: श्री के.जी.निकोडे गुरूजी यांच्या संकलित लेखातून वाचा ज्ञानवर्धक माहिती... संपादक.**



केरुनानांचा जन्म अलिबाग तालुक्यातल्या नागाव येथे दि.१६ मे १८२५ रोजी झाला. आई-वडिलांना बालपणीच अंतरल्याने त्यांना शिक्षणासाठी मुंबईस चुलत्यांकडे यावे लागले. त्यांच्यामुळेच केरुनानांना वाचनाची गोडी व कोणत्याही प्रश्नाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची सवय लागली. गणित, खगोल आणि पदार्थविज्ञानासारख्या कठीण शास्त्रांत त्यांना पुढे जी गती प्राप्त झाली, त्याचे मूळ त्यांना एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर व प्रो. आर्लिबार या व्यासंगी गुरूंकडून मिळालेल्या मूलभूत ज्ञानात सापडते. त्याच्या जोरावर केरुनानांनी प्रगल्भ ग्रंथांचे परिशीलन करून या विषयांवर घट्ट पकड बसण्याएवढे त्यातले प्रगत ज्ञान प्राप्त केले. याच्या जोडीला त्यांची असाधारण बुद्धिमत्ता लक्षात घेतली की, पुढे त्यांनी अध्यापन कौशल्य दाखवले आणि सरकारदरबारी त्यांना मिळालेल्या मानाच्या जागा मिळवल्या.मुंबईस कुलाब्याच्या दांडीवर अंतरिक्ष चमत्कार व लोहचुंबक यांचे अनुभव घेण्यासाठी इ.स.१८४०मध्ये प्रो.आर्लिबार यांनी एक वेधशाळा काढली. तिथे केरुनानांची असिस्टंटच्या जागी नेमणूक करण्यात आली. अवघ्या १५व्या वर्षी द.म.५० रुपये पगारावर मिळालेल्या या नोकरीत नानांनी पुढली १० वर्षे जागरुकपणे हवामानशास्त्राचे प्रशिक्षण घेतले. पुढील आयुष्यात कोणतेही तत्त्व अथवा संकल्पना सिद्ध होऊन पडताळा आल्याशिवाय ते स्वीकारीत नसत, याचे मूळ या नोकरीत आढळते. इ.स.१८५१पासून त्यांच्या बदल्या पुणे कॉलेजचे नॉर्मल स्कूल, व्हर्नेक्युलर कॉलेज (याचे नाव पुढे ट्रेनिंग कॉलेज झाले.) आणि अहमदनगरच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर अशा सरकारी संस्थांतून झाल्या. या प्रत्येक ठिकाणी गणित, सृष्टिशास्त्र व पदार्थविज्ञान हेच विषय ते जरुरीप्रमाणे इंग्रजी व मराठीत सराईतपणे शिकवीत असत. दरम्यान, त्यांनी इंजीनिअरिंग कॉलेजातसुद्धा सृष्टिशास्त्रावर व्याख्याने दिली.. मात्र १८६५ पासून सेवानिवृत्तीपर्यंत केरुनाना पुण्याच्या डेक्कन कॉलेजात स्थिरपणे होते. प्रोफेसर व शेवटी हंगामी प्राचार्य म्हणून जागोजागी जबाबदारीची पदे सांभाळूनसुद्धा आपल्या अध्यापनात कधी त्यांनी हयगय केली नाही की खंड पडू दिला नाही. मुलांना समजेल अशा सोप्या रीतीने शिकविण्याची त्यांची हातोटी त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी वाखाणलेली आहे. गणिताशिवाय विद्यार्थ्यांना इतर शास्त्रांचे थोडेबहुत ज्ञान देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. विद्यार्थ्यांने केव्हाही- कुठेही शंका विचारली तरी ते हसत-खेळत हरप्रयत्नाने तिची उकल करीत असत. चिपळूणकर- आगरकर या केरुनानांच्या नामवंत शिष्यांच्या चरित्रांत व ते दिवंगत झाल्यावर खुद्द आगरकरांनी लिहिलेल्या मृत्युलेखात त्यांचे विद्याव्यासंग, अध्यापन कौशल्य, स्वभावातील सौजन्य तसेच गरजू व गरीब विद्यार्थ्यांना आसरा देणे, प्रसंगी फी-पुस्तकांची त्यांची नड भागवणे, या गुणांचे प्रामुख्याने उल्लेख आलेले आहेत. त्यांनी केलेल्या आर्थिक मदतींचे ठळक उदाहरण म्हणजे, पहिल्या वर्षांच्या परीक्षेची फी भरायला आगरकरांजवळ पैसे नव्हते म्हणून एक नाटक लिहून ते, ती उभी करणार असल्याचे कळल्यावर केरुनानांनी त्यांनी अर्धवट लिहिलेल्या नाटकाचे कागद काढून घेऊन त्यांची फी भरून टाकली.मेजर कँडीच्या मराठीतून शालेय पुस्तके तयार करण्याच्या उपक्रमात केरुनानांनी सुबोध भाषेत लिहिलेली पुस्तके लोकप्रिय झाली. अंकगणितात मूलभूत क्रियांबरोबर कर्जव्यवहार, रोखे, सुतार व गवंडी यांच्या कामाची आकारणी इत्यादी व्यावहारिक उदाहरणे घातली आहेत. तर पदार्थविज्ञानात आजूबाजूच्या सृष्टीत घडणारे व्यापार, निसर्ग चमत्कार व पदार्थांचे गुणधर्म यांच्या परिचयाबरोबर प्रयोगासाठी लागणाऱ्या वस्तू व त्यांच्या किमती पुस्तकाच्या परिशिष्टात दिल्या आहेत. कधी कधी या पुस्तकात त्यांनी संवादाचे माध्यमही वापरले आहे. शास्त्रीय ज्ञान स्वभाषेत व्यक्त करण्यासाठी मुंबईत सन १८४८ साली स्थापन झालेल्या ज्ञान प्रसारक सभेच्या व्यासपीठावरून केरोपंतांनी हवा, भरतीओहोटी, कालज्ञान, सूर्यावरील डाग आणि पर्जन्यवृष्टी यांचा संबंध असे विविध विषयांवर १७ निबंध वाचले. त्यापैकी भरती-ओहोटीच्या निबंधात भरती अंतराच्या घनाच्या प्रमाणात कमी होते असे कलनाच्या मदतीने त्यांनी दाखवले आहे. केरुनानांनी लक्ष घातलेला आणखी एक विषय म्हणजे पंचांग शुद्धीकरणाचा. आपल्या सूक्ष्म अभ्यासाने त्यांच्या असे लक्षात आले की, परंपरागत पंचांगात केलेले अशुद्ध गणित व घेतलेली ग्रहस्थितींची स्थूलमाने या चुकांमुळे ऋतुकाल तसेच पंचांगात दाखवलेल्या ग्रहस्थितीचा प्रत्यक्षातल्या ग्रहस्थितीशी मेळ बसत नाही. तेव्हा ही विसंगती दूर करण्यासाठी त्यांनी पंचांग सुधारण्यासाठी बरेच दिवस आपला बहुमोल वेळ खर्च केला. पण त्यांच्या हयातीत हा उद्योग पूर्णत्वास गेला नाही. मात्र लो.टिळकांसारख्या त्यांच्या नामवंत शिष्याने राजकारणाच्या धकाधकीतही गुरूऋण जाणून व स्वतःस त्यात असलेला रस म्हणूनही ही चळवळ पुढे नेली. केरुनानांच्या पुरोगामी विचारसरणीचे द्योतक म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेस त्यांचा पाठिंबा होता. शिवाय ते मुलींच्या शाळेच्या व्यवस्थापक मंडळावर होते, श्रीमती रमाबाई रानडे यांच्या प्रेरणेने भरणाऱ्या स्त्रियांच्या सभांना हजर राहून त्यांचे शिक्षण करत. स्त्रियांना जड विषयांऐवजी गृहजीवनोपयोगी शिक्षण देण्याच्या मताचे ते होते.अशा गहन विषयांच्या व्यासंगात गढलेल्या केरुनानांना शास्त्रीय संगीत, संगीत नाटके व स्वतः पियानो वाजवण्याचीही आवड होती. शिवाय किर्लोस्कर नाटक मंडळीत त्यांचे जाणेयेणे होते. नाटकांच्या तालमींना हजर राहून ते मोरोबा वाघोलीकर आणि बाळकोबा नाटेकर या गायक नटांना गाण्याच्या अतिरेकाने नाटकाचा रसभंग होतो, असा सल्ला देत असत. त्यांच्या या गुणांवर लुब्ध होऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपले 'सौभद्र' हे नाटक त्यांना अर्पण केले आहे. असे हे थोर व्यासंगी पुरुष दि.१९ मार्च १८८४ रोजी निधन पावले. केरुनाना दिवंगत झाल्यावर टाइम्स ऑफ इंडियाने वाहिलेल्या श्रद्धांजलीत, ''प्रो.छत्रे यांना जर युरोपात पद्धतशीर शिक्षण मिळाले असते तर ते एक युगप्रवर्तक शास्त्रज्ञ म्हणून गाजले असते'' असे म्हटले होते. त्यावरून त्यांचा मोठेपणा ध्यानात येईल. !! केरुनाना छत्रे यांना त्यांच्या पुण्यस्मरणार्थ अनंत विनम्र अभिवादन !!

**संकलन तथा सुलेखन –**
**केजीएन: श्री के.जी.निकोडे गुरूजी**
**(से.नि.प्राथ.शिक्षक.)**
**मु.पो.ता.गडचिरोली.**
**फक्त दूरभाष– ७१३२७९६६८३.**

# ज्योतीताईंनी लोकसभा लढवावी,शिवसंग्राम कार्यकर्ता, पदाधिकारी बैठकीत आग्रही


**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीत लागले आहेत महायुतीचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर आघाडीच्या उमेदवाराची घोषणा होणे बाकी आहे. यात समाजस्तरातून डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी निवडणूक लढवावी यासाठी मागणी वाढत आहे. याबाबत डॉ.ज्योती मेटे काय निर्णय घेतात या कडे लक्ष लागले आहे. मात्र आज शिवसंग्राम भवन येथे कार्यकर्ते , पदाधिकारी यांची जिल्हास्तरीय बैठक पार पडली यात सर्वांनी एकमुखाने डॉ. ज्योती मेटे यांनी लोकसभा निवडणूक लढवावी अशी आग्रहाची मागणी केली.



गेल्या आठ दिवसांपासून डॉ.ज्योती मेटे यांच्या निवडणूक लढवण्यासंदर्भातील चर्चांना उधाण आले आहे. जिल्ह्यात सर्व स्तरातून डॉ.ज्योती मेटे यांनी निवडणूक लढवावी यासंधर्भात आग्रह होत आहे. या पार्श्वभूीवर जिल्हाध्यक्ष नारायण काशीद यांच्या उपस्थितीत वरिष्ठ पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, सर्कल प्रमुख गण प्रमुख यांच्या सह प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली यास गणेश ढवळे, दिनेश पवार, गेवराई तालुकाध्यक्ष कैलास माने, केज तालुकाध्यक्ष नामदेव गायकवाड, माजलगाव तालुकाध्यक्ष उत्तमराव पवार, फिरोज पठाण, वडवणी तालुका अध्यक्ष सुग्रीव मुंडे,अंबाजोगाई तालुका अध्यक्ष धनेश गोरे, शिरूर तालुकाध्यक्ष माऊली शिंदे, परळीचे कैलास नाईकवाडे, आष्टी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी, मनीषा कुपकर, साक्षी हंगे, यात शिवसंग्रामच्या मावळ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले ज्योतीताई मेटे यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी अशीच मागणी सर्व उपस्थितानी केली आणि आम्ही सर्व कार्यकर्ते आज पासून निवडणुकीच्या कामाला लागू असे आश्वासन यावेळी दिले. यावेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेला भावना डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या पर्यंत पोहोचून निवडणूक लढवण्याची विनंती करणार असल्याचे शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद यांनी म्हटले आहे.बैठक सुरू असताना शिवसंग्राम चे कार्यकर्ते पदाधिकारी आपापल्या सूचना आणि मत व्यक्त करीत होते यावेळी कदम नावाच्या एका युवकाने आपले मत व्यक्त केले मत व्यक्त करताना मी शिवसंग्राम चा कार्यकर्ता नाही हे सर्वप्रथम स्पष्ट करतो परंतु ज्यावेळी मला ज्योतीताई मेटे निवडणूक लढणार आहेत हे कळले त्यासाठी आज मी या ठिकाणी आलो आहे मी ठाण्याला जॉब करतो परंतु ज्योतीताईंसाठी मी एक महिन्याची रजा टाकून तन-मंधनाने ज्योतीताईंचा प्रचार करेल अशी ग्वाही दिली. याचवेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले आणि उच्चशिक्षित ज्योतीताई मेटे यांना लोकसभेत पाठवण्यासाठी मी खंबीरपणे शिवसंग्राम ला साथ देणार असल्याचे ढवळे यांनी म्हटले.

# कुणबींच्या ६० हजार नोंदीं पैकी पाच हजारांना दाखले



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत ६० हजार ४७२ कुणबी मराठाच्या नोंदी आढळल्या आहेत. नोंदी मोठ्या प्रमाणात आढळल्या आहेत, परंतु आतापर्यंत केवळ ५ हजार २७७ कुणबी दाखल्यांचेच वाटप झाले आहे. सापडलेल्या नोंदीच्या दहा टक्केही दाखले अद्याप जिल्ह्यातील मराठा समाजाला मिळाले नसल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनामुळे राज्यभरातील कुणबी नोंदीचा शोध घेण्यात आला आहे. या शोध मोहिमेत जिल्ह्यात आतापर्यंत ६० हजार ४७२ नोंदी सापडल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील मराठा समाजाला दहा टक्क्यांचे आरक्षण देण्याची घोषणा २० फेब्रुवारी रोजी केली आहे.या घोषणेला आता एक महिना होत आला तरीही या नव्या आरक्षणानुसार जातीचा दाखला कसा काढावा? याबद्दलची कसलीच नियमावली जिल्हा प्रशासनाकडे आलेली नाही. नव्या आरक्षणाची नियमावली नाही, कुणबीची नोंद आढळली आहे. परंतु जात प्रमाणपत्र काढण्यासाठी प्रशासकीय अडथळ्यांची शर्यत संपत नाही, अशा दुहेरी संकटात मराठा समाजाला कसरत करावी लागत आहे.

# सामाजिक बांधिलकी जोपासत रामकिसन मस्के यांनी विद्यादानाचे पवित्र कार्य केले-डॉ.प्रतापसिंह शिंदे

## मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मस्के सरांचा सेवापुर्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील त्र्यंबकेश्वर शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षक रामकिसन गुंडीबा मस्के यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा रविवार रोजी शहरातील अनिकेत मंगल कार्यालय येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्र्यंबकेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.प्रतापसिंह शिंदे हे होते. तर विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, माजी आमदार पृथ्विराज साठे, बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे, शाळेचे मुख्याध्यापक जी.डी चव्हाण, आर.बी मगर, बाळासाहेब काळे व सत्कारमूर्ती रामकिसन मस्के तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.मस्के ताई इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्ज्वलन करण्यात आले. यानंतर सुरवसे सर यांनी जिजाऊ वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरूवात केली. जिजाऊ वंदनेनंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत मस्के सरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर मस्के सरांचे व्याही बाळासाहेब काळे यांना महाराष्ट्र शासनाचा उद्यान पंडित हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या कुटुंबियांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते आदरपूर्वक सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्ती रामकिसन मस्के व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.मस्के ताई यांचा ही सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांनी बोलत असताना मस्के सरांनी गणितासारखा अवघड विषय शिकवित असताना आयुष्याच्या बेरीज वजाबाकीचा तंतोतंत हिशोब जुळवून बेरजेचे आयुष्य जगत असताना माणसांची बेरीज ते करीत गेले म्हणूनच आज त्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी हा मोठा जनसमुदाय या ठिकाणी जमला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तर माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी मस्के सरांनी विद्यार्थी घडवित असताना प्रत्येक विद्यार्थ्याला प्रोत्साहन देऊन शिक्षणाच्या प्रवाहात नुसते टिकवूनच ठेवले नाही. तर त्याला त्याच्या लक्ष्यापर्यंत पोहोचेपर्यंत ते मार्गदर्शन करतात असे मत त्यांनी मांडले. तर राजकिशोर मोदी यांनी मस्के सर हे जरी गणितासारख्या अवघड विषयाचे शिक्षक असले तरी हा विषय अगदी सोपा करून विद्यार्थ्यांच्या गळी उतरविण्याचे काम हे त्यांनी उभ्या आयुष्यात केले. त्यामुळे त्यांच्या शाळेचे संस्थेचे, नांव झाले. आज त्यांची शाळा ही नांवारूपाला आलेली आपल्याला दिसते. त्यात मस्के सरांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे असे सांगितले. तर बबनराव लोमटे यांनी नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक विद्यालय नांवारुपाला येण्यात जसा संस्थेचा वाटा असतो. तसाच शिक्षकांचा ही मोठा वाटा असतो. यात मस्के सरांनी गणितासारखा विषय अगदी सहजपणे शिकवित असताना विद्यार्थ्यांना आयुष्याचं गणित ही सोडवण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मुख्याध्यापक गोविंदराव चव्हाण यांनी मस्के सरांनी त्यांच्या एकूण ३४ वर्षांच्या सेवेत वेळेला अत्यंत महत्त्व देऊन अत्यावश्यक असेल तरच त्यांनी रजा घेतल्याचा उल्लेख केला तसेच न चुकता दररोजचा परिपाठ ते घेत असत, एकूणच शाळेचे नांव मोठे करण्यात मस्के सरांचेही योगदान महत्त्वाचे राहिले असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. यावेळी सत्काराला उत्तर देत असताना रामकिसन मस्के यांनी आपल्या एकूण ३४ वर्षांच्या सेवेची त्रोटक माहिती देऊन या काळात आपण शाळेसाठी पूर्णपणे झोकून देऊन काम करीत असताना अंबाजोगाई व परिसरातील ग्रामीण भागातील विविध जाती-धर्माच्या, पंथाच्या, वंशाच्या विद्यार्थ्यांना समान न्याय देऊन त्यांना मार्गदर्शन करून घडविण्याचे काम केले. तर गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या माध्यमातून विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आपण नेहमी पुढाकार घेतला व संस्थेच्या माध्यमातून व सर्वांच्या सहकार्याने हे वसतीगृह नांवारूपाला आणण्याचे काम आपण करू शकल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. हे करीत असतानाच मराठा सेवा संघाच्या माध्यमातून आपण सामाजिक कार्यही करत राहिलो त्या माध्यमातून समाजाचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी पुढाकार घेत राहिलो. तर पुढील काळात आपण सामाजिक कार्यात असेच सक्रिय राहून समाजाचे, विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासंदर्भात आग्रही राहणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना संस्थेचे सचिव प्रतापसिंह शिंदे म्हणाले की, मस्के सरांनी शाळेसाठी दिलेले योगदान हे अत्यंत मौलिक व समाधानकारक आहे. शाळेचे वसतिगृह हे केवळ आणि केवळ मस्के सरांमुळेच नांवारूपाला येऊ शकले व या ठिकाणी चांगल्या सोयी, सुविधायुक्त ते बनू शकले. तर मस्के सरांनी त्यांचे सामाजिक कार्य कधीच शाळेच्या कामाच्या आड येऊ दिले नाही असेही मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी बापू देवकते, सुरवसे सर, ड.पी.जी शिंदे, सातपुते सर, बडे सर, सौ.सुरेखा काळे मॅडम, सौ.सेलूकर मॅडम इत्यादी मान्यवरांनी ही श्री.मस्के यांच्या बाबतीत आपले यथोचित मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी, पालक, सरांचा मित्र परिवार, नातेवाईक, आप्तेष्ट, चळवळीतील सहकारी, प्रतिष्ठीत नागरिक यांनी मस्के सर यांचा सेवापूर्तीनिमित्त विशेष सन्मान केला. या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर आयोजन नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक व प्राथमिक विद्यालयाच्या सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.डॉ.सतीश कदम यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सौ.नेहरकर मॅडम यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



# मनोरुग्ण निराधार अनाथांची सेवा करणे हे फार मोठे धाडसाचे कार्य आहे-राजेश बारसागडे

## नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज निवारा गृहाचे भूमिपूजन समारंभ

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

मनोरुग्ण,निराधारांची सेवा करणे फार मोठे कठिण आणि धाडसाचे कार्य आहे.समाजांनी दुर्लक्षित केलेल्या या घटकाला समाजाच्या मुख्य प्रहावात आणण्याचे कार्य गावातीलच एक होतकरू परमेश्वर मडावी नावाचा तरुण डोमाजी आधार फाउंडेशनच्या माध्यमातून करतो आहे.आणि आता तर अशा लोकांना राहण्यासाठी निवारा गृहाची व्यवस्था ही तो करतो आहे. हे असामान्य कार्य करण्याचे धाडस त्यांनी पेलले आहे.हे कौतुकास पात्र आहे असे मनोगत महाराष्ट्र शासन 'बालकवी' पुरस्कृत कवी तथा पत्रकार राजेश बारसागडे यांनी व्यक्त केले.

नागभीड तालुक्यातील नांदेड येथील मनोरुग्ण,निराश्रित,अनाथ लोकांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या डोमाजी आधार फाउंडेशन तर्फे शुक्रवारी दि.१५ मार्च रोजी येथील दानवीर शेतकरी रामकृष्ण मसराम यांनी डोमाजी आधार फाउंडेशला दान दिलेल्या जागेत छत्रपती शिवाजी महाराज निवारा गृहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमाचे उदघाटन साहित्यिक,पत्रकार राजेश बारसागडे व सामाजिक कार्यकर्ते रवी चल्लावार यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यस्थानी नांदेडचे माजी उपसरपंच दुर्वेश रामटेके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मुर्लीधर गौरकार,राजू बन्सोड,हिराचंद बारसागडे, पत्रकार तुलोपचंद गेडाम,प्रा. हिरालाल बन्सोड,ग्रा.पं.सदस्य रजनी कुंभारे,शीतल बारसागडे, जयदा खोब्रागडे, मेघराज खोब्रागडे,आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर,बिरसा मुंडा,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,डॉ.अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद या महापुरुषांच्या प्रतिमेची पूजन करून पुष्पमाला अर्पण व दीप प्रज्वलन करण्यात आले.यानंतर गडचिरोली जिल्हा रुग्णालयातील पॅथॉलॉजिस्ट, सामाजिक कार्यकर्ते



डॉ.रवी चल्लावार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज निवारा गृहाचे भूमिपूजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात दुर्वेश रामटेके यांनी परमेश्वर मडावी यांच्या मागील पाच वर्षाच्या मनोरुग्ण, निराधारांच्या सेवेचा गोषवारा सांगितला. व त्यांचे हे सेवाभावी कार्य तडीस नेण्यासाठीमित्र मंडळी सदा तत्पर असल्याची हमी दिली.रवी चल्लावार यांनी परमेश्वर मडावी हा उमदा तरुण समाधान दूर सारलेल्या वेड्या, मनोरुग्न लोकांसाठी कार्य करतो आहे.हे कार्य परमेश्वराचे कार्य आहे. पण परमेश्वरच्या नावातच 'परमेश्वर' आहे. याची खात्री पटली. आणि सर्वतोपरी आर्थिक मदत करून या समाजसेवी कार्यात हातभार लावण्याचे भाग्य मिळाले.असे विचार व्यक्त केले.याशिवाय राजू बन्सोड,प्रा. बन्सोड,सरपंच मुर्लीधर गौरकार यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डोमाजी आधार फाउंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष परमेश्वर मडावी यांनी केले.संचालन सुबोध खोब्रागडे यांनी केले. तर आभार कार्तिक उईके यांनी मानले. अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

# खडसंगी-मुरपार जि.प.क्षेत्राची संघटनात्मक बैठक संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार भांगडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत चिमूर तालुक्यातील खडसंगी येथे भाजपा नेते डॉ. दीपक दडमल यांच्या निवासस्थानी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी खडसंगी-मुरपार जिल्हा परिषद क्षेत्राची संघटनात्मक बैठक पार पडली.या बैठकीत आमदार कीर्तिकुमार भांगडीया उपस्थित भाजपा नेते, पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांना विविध महत्वपूर्ण संघटनात्मक विषयांवर मार्गदर्शन केले आणि स्थानिक पातळीवर सर्वसामान्य जनतेसाठी व पक्षासाठी अधिक जोमाने, उत्साहाने, मेहनतीने काम करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.



दरम्यान, भाजपा खडसंगी-मुरपार जिल्हा परिषद क्षेत्राच्या वतीने आमदार बंटीभाऊंचे आगमनाप्रसंगी उपस्थित माता-भगिनींनी औक्षण केले व मनी रॉय यांच्या हस्ते भगवा दुपट्टा भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन भाजपा ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष एकनाथ थुटे यांनी केले. या बैठकीला सर्वश्री भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, भाजपा तालुका महामंत्री प्रशांत चिडे, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजयुमो तालुकाध्यक्ष श्रीरंग (बालू) पिसे, भाजपा ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष एकनाथ थुटे , चिमूर कृ.उ.बा. समिती संचालक दिनकर सिनगारे, भाजपा ज्येष्ठ नेते बंडू बारेकर, माजी सभापती/नगरसेवक न.प. चिमूर सतिश जाधव, भाजपा नेते विनोद रणदिवे, भाजपा किसान मोर्चा जिल्हा कार्यकारणी सदस्य आदित्य कारेकार, भाजपा पं. स. सर्कल प्रमुख (तिरखुरा) विलास घारगे, भाजपा नेते अरुण लोहकरे, भाजपा युवा नेते विक्रांत कोरेकार, भाजपा युवा नेते कुणाल कावरे, भाजपा पं. स. सर्कल सहप्रमुख तथा शक्ती केंद्र प्रमुख शिवापूर (बं.) मनी रॉय, भाजपा नेते दशरथ नन्नावरे, उपसरपंच ग्रा.पं. शिवापूर (बं.) आदित्य वासनिक, भाजपा नेते डॉ. दीपक दडमल, भाजपा शक्ती केंद्र प्रमुख आमडी (बे.) मोरेश्वर डंभारे, भाजपा शक्ती केंद्र प्रमुख तिरखुरा दिलीप नलोडे, भाजपा शक्ती केंद्र प्रमुख खडसंगी नाना मेश्राम, जि प सर्व गावातील बुथ अध्यक्ष भाजपा बूथ अध्यक्ष कन्हाळगाव स्वप्नील भुसारी, येरखेडा दामोधर कुबडे, गरडापार अमर दडमल, तिरखुरा गणेश मगर, नवेगाव (पेठ) रितेश झाडे, कवठाळा राजकुमार राणे, गदगाव मंगेश कावळे, मुरपार (तु.) मारोती गायकवाड, सोनेगाव (वन) पांडुरंग सोनवाने, वहानगाव विकास मेश्राम, आमडी (बे.) अरुण बगणे, भिवकुंड प्रशांत काथवटे, बोथली (वहा.) सुरेश मांडवकर, गुजगव्हान मोरेश्वर निखाडे, नवेगाव (राम.) प्रकाश चौधरी, हरिश्चंद्र कामडी, बादल बडगे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

### आनंद निकेतन कृषी महाविद्यालयात

# शुद्ध दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती प्रशिक्षणाचे आयोजन

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित तथा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय आनंदवन, वरोरा येथे दिनांक ७ मार्च ते १२ मार्च २०२४ दरम्यान शुद्ध दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती प्रशिक्षण पार पडले. हे प्रशिक्षण राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था, हैदराबाद, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था नागपूर, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, चंद्रपूर अंतर्गत राबविण्यात आले.



सदर प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुहास पोतदार, प्राचार्य आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा, उद्घाटक डॉ. सुनील रोकडे, माजी प्रमुख शास्त्रज्ञ केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र , नागपूर हे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणात विविध विषयांवर तज्ञ वक्त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. सुनील रोकडे यांनी शुद्ध दूध उत्पादन काळाची गरज व सद्यस्थिती याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. मुकुंद पातोंड व डॉ. सुबोध गाजर्लवार यांनी प्रशिक्षणार्थ्यांना दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती यावर प्रात्यक्षिके करून दाखविली.डॉ. मनोज जोगी यांनी दुग्धजन्य पदार्थातील सूक्ष्म जीव जंतूचे प्रात्यक्षिके सादर केली. डॉ. पांडूरंग कौठेकर यांनी दूध निर्मिती खर्च ताळमेळ व विक्री व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. पंचायत समिती वरोरा येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. आनंद नेवारे यांनी शासनाच्या दूध उद्योग उभारणीसाठीच्या विविध योजनांबाबत माहिती दिली. अन्न व औषध प्रशासन स. आयुक्त जिल्हा चंद्रपूरचे रोहन शहा यांनी भेसळ बाबत कायदे संबंधित मार्गदर्शन केले व त्याचप्रमाणे प्रफुल टोपले स. आयुक्त अन्न व औषध प्रशासन जिल्हा वर्धा यांनी दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी परवाने व दूध भेसळ या विषयावर प्रकाश टाकला.प्रशिक्षण समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, अन्न व औषध प्रशासन अधिकारी स. आयुक्त प्रफुल्ल टोपले व स. आयुक्त रोहन शहा यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण समन्वयक डॉ. मुकुंद पातोंड, विभाग प्रमुख पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, सह समन्वयक डॉ. सुबोध गाजर्लवार, सहायक प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, हर्षाली देशमुख, प्रयोगशाळा परिचर व सुभाष वेलादी यांनी प्रयत्न केले.

# चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्रात होणार १५१ मंदिरांमध्ये आराधना

### ना.मुनगंटीवार यांच्या विजय संकल्पासाठी कार्यकर्त्यांचा निर्धार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार तथा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विजय संकल्पासाठी संपूर्ण लोकसभा मतदारसंघामध्ये दि. १९ मार्च २०२४ ला एकाचवेळी सायंकाळी ६ वाजता परमेश्वराची आराधना करण्यात येणार आहे. सामान्य कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांनी हे अनोखे आयोजन केले आहे.



ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या लोकसभा निवडणुकीतील विजयाकरीता मतदारसंघामधील मंदिरांमध्ये विधिवत पूजा-अर्चना होणार आहे. याकरीता आमदार संजिव रेड्डी बोतकुलवार, आमदार डॉ. संदीप धुर्वे, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, यवतमाळचे जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे,लोकसभा प्रमुख प्रमोद कडू, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, पुजनीय भागवताचार्य संत श्री. मनीष महाराज,रविंद्र बेल्लुरकर, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्या गुरनुले, ब्रिजभूषण पाझारे, डॉ. मंगेश गुलवाडे, विवेक बोढे, प्रज्वलंत कडू, सुरज पेदुलवार, रामपाल सिंग, किरण बुटले, राजू गायकवाड, महेश देवकते, विशाल निंबाळकर, आशिष देवतळे, अनिल डोंगरे, श्रीनिवास जंगमवार, रितीक परचाके, रविंद्र पिंपळशेंडे पुजेचे व्यवस्थापन करतील, अशी माहिती आध्यात्मिक आघाडी लोकसभा सहसंयोजक मयूर चहारे यांनी दिली.

### नंदीग्राम एक्सप्रेस सुरू झाल्याने

# नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण-डॉ.आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांना मुंबईला प्रवास करण्यास अत्यंत सोयीचे झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे प्रतिपादन डॉ. अंकुश आगलावे जिल्हाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा ;ग्रामीण यांनी एका प्रसिध्दी पत्रकात केले.



हंसराज अहीर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मुंबई- आदिलाबाद नंदीग्राम एक्सप्रेस ११४०१/११४०२ चा बल्लारशाह पर्यंत विस्तार करण्यात आलेला आहे. बल्लारशाह रेल्वे स्थानक येथून दि. १६ मार्च २०२४ रोजी मागासवर्गीय आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी हिरवी झेंडी दाखवून ही गाडी मुंबई करीता रवाना केली.नंदीग्राम एक्सप्रेस मुळे प्रवाश्यांची गैरसोय होणार नसल्याचे डॉ. आगलावे यांनी सांगितले. यावेळी चंद्रपूर रेल्वे स्थानकावर प्रवाश्यांची, रेल्वे कर्मचारी व मोठया संख्येने भाजपा पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# पोंभूर्ण्यातील ४९ केंद्रातून ६७७ निरक्षरांनी दिली परिक्षा

**पोंभूर्णा । प्रतिनिधी**

केंद्र पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत रविवार दि.१७ मार्चला निरक्षरांची पायाभूत साक्षरता आणि मूल्यमापन चाचणी परीक्षा घेण्यात आली.पोंभूर्णा तालुक्यातील ४९ केंद्रातून ६७७ निरक्षरांनी परीक्षा दिली.परीक्षेमध्ये वाचन,लेखन आणि संख्याज्ञान अशा तीन भागांत परीक्षा घेण्यात आली होती.जेष्ठ निरक्षरांनी परिक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता.

शासनाच्या निर्देशानुसार ज्यांना लिहिता वाचता येत नाही अशा असाक्षर व्यक्तींसाठी शाळेमध्ये १० ते ५ या वेळात पेपर आयोजित करण्यात आले होते.तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर पार पडलेल्या या परीक्षेमध्ये वाचन, लेखन आणि संख्याज्ञान अशा तीन भागांत परीक्षा घेण्यात आली होती. प्रत्येकी ५० या प्रमाणे १५०

**पोंभूर्ण्यात ४९ केंद्रातून ६७७ निरक्षरांनी परीक्षा दिली आहे.परिक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले.**
**– अर्चना मासीरकर,**
**गटशिक्षणाधिकारी पं.स.पोंभूर्णा**

गुणांची ही परीक्षा होती. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागात किमान ३३ गुण आवश्यक आहेत. सदर पेपर हा तीन तासांचा होता.दिव्यांग व्यक्तींसाठी अर्ध्या तासाचा अधिकचा वेळ देण्यात आला होता.पोंभूर्णा तालुक्यातील ४९ केंद्रातून ६७७ निरक्षरांनी परीक्षा दिली.सदर परिक्षा यशस्वी करण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक,केंद्रसंचालक, गटशिक्षणाधिकारी यांनी काम पाहिले.

# मेंढा (ख.) येथील आकाश विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात बाल आनंद मेळावा

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील मेंढा (ख.)येथील आकाश विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवारी बाल आनंद मेळावा पार पडला. यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पदार्थ आणि वस्तूंचे स्टॉल्स लावले होते.विद्यार्थ्यांमधील व्यावहारिक गुण विकसित व्हावा यासाठी हा मेळावा घेण्यात आला.

या बाल आनंद मेळाव्याचे उदघाटन मंगळवारी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.वाय.कोरे यांच्या हस्ते करण्यात आले.



विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा योग्य दिशेने विकास व्हावा यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जातात.त्याचाच भाग म्हणून विद्यालयात बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वस्तूंचे स्टॉल्स लावून त्या वस्तू विद्यार्थ्यांनी विकण्याचा व्यवसाय केला.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांच्या विकासाबरोबरच दैनंदिन व्यवहार त्यांना समजले पाहिजेत. व्यवहारीक जगाची त्यांना ओळख झाली पाहिजे यासाठी व एक सुजाण नागरिक घडविण्यासाठी बाल आनंद मेळावा घेण्यात आला असल्याचे मत मुख्याध्यापक कोरे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाला शिक्षिका कुंभलवार,जगनाळे, भांडारकर,मडावी, सहायक शिक्षक मडावी, एम.मेश्राम यांची उपस्थिती होती.

# बीड तालुक्यातील पिंपळवाडी गावचां डोंगरी भागात समावेश

## जयदत्त क्षीरसागरच दूरदृष्टी असणारे नेतृत्व-अर्जुन बहिरवाळ

**बीड । प्रतिनिधी**

डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत बीड तालुक्यातील ३९ गावाला विकास निधी मिळन्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.बीड जिल्ह्यातील लोकाभिमुख असणारे नेतृत्व शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागाला लागणाऱ्या विविध योजना ग्रामीण भागातील जनतेसाठी लागणाऱ्या वाडी वास्ती तांडे सुधारणा साठी लागणारे शासकीय योजनांना प्राधान्य देऊन शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करणारे अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जातं असे लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करून बीड तालुक्यातील ३९ गावांना डोंगरी भागात समावेश करून



घेण्यासाठी प्रशासनाला वेळोवेळी पाठपुरावा करून ते पदरात पाडून घेण्यात यश आले आहे. विविध गावातील मंडळींनी त्यांचया वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्याप्रमाणे अण्णांनी पण शासनाकडे पाठपुरावा करत आज हे काम पूर्णत्वास कडे नेऊन पिंपळवाडी सारख्या गावाला प्राधान्य देऊन अण्णांनी आज ते डोंगरी भागात त्याचा समाविष्ट करून अण्णा हेच विकासभूमुखी नेतृत्व आहे हे दाखवून दिले पिंपळवाडी गाव नक्कीच अन्नाच्या मागे उभा राहील अण्णाच हे आमचे नेते अण्णाच आमचा पक्ष आहे असा विश्वास या गावचे माजी सरपंच गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ व श्रीरंगजी खटाणे. संभाजी पाटील. मधुकर पाटील .शेख रईसोद्दीन.गणेश कलढोणे.रामा खटाणे.संजय बहिरवाळ.अगंद भंडाने.संतराम बहिरवाळ .आफसर पठान. दत्ता बहिरवाळ.बाळासाहेब कळसाने हारीदास पाखरे.वसंत नहिराळे.राजाभाऊ नहिराळे.व समस्त गावकरी मंडळी यांनी आभार मानले.

# बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात ३००९७८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## १९ एप्रिलला मतदान;१५८८ कर्मचारी राहणार तैनात;३६१ मतदान केंद्र, संवेदनशील केंद्र-०

**पोंभूर्णा । प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुक कार्यक्रमाची रुपरेषा व निवडणूक प्रक्रिये विषयी माहिती देण्यासाठी दि.१७ मार्च रोजी उपविभागीय कार्यालय मुल येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.उपविभागीय अधिकारी मुल तथा ७२-बल्लारपूर विधानसभा मतदारसंघ सहा. निवडणूक निर्णय अधिकारी विशालकुमार मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघात पहिल्या टप्यात निवडणूका पार पडणार असल्याने आचारसंहितेचे काटेकोर पालन व निवडणूकीचे वेळापत्रक,विधानसभा निहाय मतदारांची आकडेवारी याबाबत सविस्तर माहिती पत्रकार परिषदेतून देण्यात आली.

भारत निवडणूक आयुक्त यांनी १६ मार्चला लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला होता.लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक १९ एप्रिलला जाहिर करण्यात आली.लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सहा.निवडणूक निर्णय अधिकारी ७२-बल्लारपूर विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी मुल यांनी विधानसभा निहाय निवडणूक प्रक्रिया, मतदार, मतदान केंद्र, विशेष व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील तैनात कर्मचारी यांची पत्रकार परिषदेत माहिती दिली.बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात एकूण ३ लक्ष ९७८ मतदार आहेत.यात पुरूष १,५३,९५६ मतदार, महिला १४७०१९ तर इतर मध्ये ३ मतदारांचा समावेश आहे आहे.बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात जुने ३५७ मतदान केंद्र असून नविन ४ मतदान केंद्र प्रस्तावित केले आहे.असे एकूण ३६१ मतदान केंद्र राहणार आहेत.संवेदनशिल मतदान केंद्राबाबत आकडा निरंक दाखवण्यात आला आहे.सर्व निवडणूक प्रक्रियेसाठी १५८८ कर्मचारी निवडणूक प्रक्रियेसाठी तैनात राहणार असल्याची माहिती विशालकुमार मेश्राम यांनी दिली.यावेळी मुल तहसीलदार मृदुला मोरे, पोंभूर्णा तहसिलदार शिवाजी कदम,आचार संहिता नोडल अधिकारी निलेश चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मतदान केंद्रांवर दिव्यांग, गर्भवती स्त्रिया, वयोवृद्ध मतदारांकरिता विशेष व्यवस्था-



मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदाराकरिता वेगळी व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच गर्भवती स्त्रिया, वयोवृध्द मतदारांकरिता सुध्दा विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यांना मतदानाकरिता प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

काहींना जर मतदान केंद्रावर येऊन मतदान करता येणे शक्य न झाल्यास त्यांना पोस्टल मतदानाच्या माध्यमातून घरून मतदान करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.पोष्टल मतदानाबाबत १२ डी फार्म भरल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहा.निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करून पोस्टल मतदान करता येईल.अपंग म्हणून संबंधित मतदार हा ४० टक्के पेक्षा वर असणे अपेक्षित आहे.तर ८५ वयवर्षे पेक्षा जास्त असलेल्या वृद्धांना पोस्टल मतदानाचा लाभ घेता येईल.

ध्वनीक्षेपकाचा वापर हा सकाळी ६-०० रात्री १०-०० वाजेपर्यंत करायचा आहे. यासंबंधाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात येणार आहे.

पेड न्युजसाठी स्वतंत्र नियंत्रण समिती नेमून त्यावर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.पेड न्युज प्रसिध्द करता कामा नये.सोशल मिडिआ मध्ये आक्षेपार्ह मजकुर असल्यास त्यावर कारवाही करण्यात येईल.


राजकीय जाहिरातीच्या प्रसारण पूर्व प्रमाणीकरण करण्यासाठी राजकीय पक्ष माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती कडे संपर्क करावा लागेल. त्याअनुषंगाने आयोगाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

**वेळापत्रक:-**

-२०मार्च २०२४- अधिसूचना जाहीर करणे
-२७ मार्च २०२४ - नामनिर्देशन पत्र दाखल करणे
-२८ मार्च २०२४- नामनिर्देशन पत्राची छाननी
-३० मार्च २०२४ - उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख
-१९ एप्रिल २०२४- मतदान
-४ जून २०२४ - निकाल

## शहरातील स्थानिक की ग्रामीणमधील उमेदवार? सोलापूर लोकसभा मतदारसंघात ६ पैकी ५ आमदार सत्ताधाऱ्यांचे, तरी भाजपचा उमेदवार ठरेना

**सोलापूर :** सोलापूर लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यातील शहर मध्य मतदारसंघात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आमदार आहेत. पण, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, शहर उत्तर, पंढरपूर-मंगळवेढा व मोहोळ या पाच विधानसभा मतदारसंघात भाजप व मित्र पक्षाचे आमदार आहेत. तरीसुद्धा अद्याप भाजपने सोलापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार कोण, याची घोषणा केलेली नाही हे विशेष.



माढा लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मोहिते-पाटील नाराज झाल्याची सद्य:स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर लोकसभेचा उमेदवार अंतिम करण्यापूर्वी भाजप पक्षश्रेष्ठींकडून सावध पावले उचलली जात आहेत. मागील दहा वर्षांतील भाजपच्या दोन्ही खासदारांच्या कामगिरीवर सध्या नाराजीचा सूर आहे. त्यामुळे भाजपला आता या निवडणुकीत विजयासाठी ताण काढावा लागणार हे निश्चित. राजकीय समीकरणे बदलल्यामुळे भाजपला विजयाची खात्री आहे, तरीपण सोलापूर लोकसभेसाठी उमेदवार कोण असावा, यासाठी पक्षश्रेष्ठींसमोरील पेच अजूनही सुटलेला नाही. रविवारी माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना उमेदवारी मिळेल, अशी चर्चा सुरु होती. पण, पक्षातील कोणत्याही नेत्याने त्यावर अधिकृतपणे प्रतिक्रिया दिलेली नाही.काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांचे नाव पक्षाला कळविण्यात आल्याने त्यांनी प्रचार सुरु केला आहे. मंगळवेढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर या तालुक्यात त्यांनी प्रचारसभांचा सपाटा सुरु केला आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम झाल्याचे नेत्यांकडून सांगितले जात आहे, पण उमेदवारांची यादी अजून जाहीर झालेली नाही. वंचित बहुजन आघाडीने सोलापूरवर दावा केल्याने तिढा सुटला नसल्याचे बोलले जात आहे. तरीदेखील काँग्रेस या जागेवर ठाम असून आमदार प्रणितींनाच उमेदवारी मिळेल, या विश्वासाने सर्वजण कामाला लागले आहेत. स्वतः आमदार प्रणिती शिंदेंनी देखील गावोगावी भेटी सुरु केल्या असून त्या भाजपवर सडकून टीका करीत आहेत.भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन रविवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी अकलूज येथे जाऊन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटलांसह त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांची भेट घेऊन उमेदवारीसंदर्भातील नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. तत्पूर्वी, त्यांनी सोलापूर लोकसभेचा उमेदवार कोण असावा, यासंदर्भात देखील तीन दिवसांपूर्वी स्थानिक आमदारांची भेट घेतली होती. पण, अद्याप उमेदवारीचा तिढा सुटलेला नाही.

## मुंजा फुलारी यांची दिव्यांग हक्क मोर्चा महाराष्ट्र या संघटनेच्या सेलु तालुकाध्यक्ष पदी निवड



**सेलू । प्रतिनिधी**

सेलु तालुक्यातील चिकलठाणा बु. येथील मुंजा किशनराव फुलारी यांची दिव्यांग हक्क मोर्चा महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या सेलु तालुकाध्यक्ष पदि निवड झाली यावेळी संघटनेचे परभणी जिल्हाध्यक्ष मा.गुलाबराव खेडेकर यांच्या हस्ते नियुक्ति पत्र देऊन नियुक्ति करण्यात आली व पुढील सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी दिव्यांग हक्क मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव खेडेकर,विष्णु नाईकनवरे,शैलेश नवघडे,चंद्रशेखर शिंदे,अरुण ताठे,कृष्णा तिडके,कैलास गोरे,आदित्य खरात,संदिप फुलारी,कुमार कुंभकर्ण आदी उपस्थित होते.

## शेख सालिक रिजवान हुसेन तीन सुवर्ण पदकाने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पोदार इंटरनॅशनल स्कूल अंबाजोगाई शाळेचा विद्यार्थी शेख सालिक रिजवान हुसेन याला तीन सुवर्ण पदक देऊन सन्मानित करण्यात आले.भारत सरकार द्वारा प्रमाणित,हिंदी ऑलिम्पियाड फाऊंडेशन( कजत्र) न्यू दिल्ली, यांच्यातर्फे २४ ऑगस्ट २०२३ रोजी घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल हिंदी ऑलिम्पियाड परीक्षा इयत्ता तिसरी मध्ये शेख सालिक याने प्रथम क्रमांक मिळवला.तसेच इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड (खचज) परीक्षेत तिसरा क्रमांक मिळवला.आणि मुथाई स्पोर्ट्स असोसिएशन लातूर तर्फे घेण्यात आलेल्या पहिले मराठवाडा मुथाई चॅम्पियनशिप मार्शल आर्ट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.यानिमित्त त्याला मान्यवरांकडून तीन सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक कीर्तिकुमार देशमुख सर, पोदार प्रेप च्या मुख्याध्यापिका अनुराधा शिंदे मॅम,रसाळ सर, ज्योती स्वामी मॅम,रेणु झिरमिरे मॅम,जागृती चव्हाण मॅम,सागर केंद्रे सर,दिक्षा मॅम,रंजना सोनवणे मॅम,शेख राशीद सर,सय्यद आमील सर,सय्यद मुखीद सर,नलिनी पाटील मॅम,कल्पना मुंडे मॅम,क्रांती कुलकर्णी मॅम व ईतर मान्यवर उपस्थित होते.या




देदीप्यमान यशामध्ये सालिक ला आई-वडील,पूनम गुजर मॅम,स्मिता बुरांडे मॅम,चौधरी सीमा मॅम,सय्यद मुखीद सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे तो सांगतो.दिलदार फाऊंडेशन बीड चे संस्थापक अध्यक्ष शेख दिलदार शेख ईस्माईल यांचा नातू असलेला शेख सालिक याने इयत्ता पहिली मध्ये महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यात दुसरा तर इयत्ता दुसरी मध्ये ज्युनियर आय.ए.एस. परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले होते. भविष्यात क्लास वन अधिकारी बनुन देश सेवा करणार असल्याचे मनोगत यावेळी शेख सालिक रिजवान हुसेन ने व्यक्त केले.या देदीप्यमान यशाबद्दल शेख सालिक चे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संविधान अन् देशाचं नाव बदलण्या साठी यांना '४०० पार' हवंय-उद्धव ठाकरे

### हुकुमशाहीविरोधात लढाईचा केला निर्धार

**मुंबई । वृत्तसंस्था**

भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोप सभेतून शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. देशाचं नाव व संविधान बदलण्यासाठी यांना ४०० पार हवंय, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपवर निशाणा साधला आहे.

भाजप एक फुगा आहे. मला वाईट याचं वाटतं की, या फुग्यात हवा भरण्याचं काम आम्हीच केलं होतं. संपूर्ण देशात भाजपचे दोन खासदार होते. त्या फुग्यात आम्ही हवा भरली, त्यांच्या डोक्यात आता हवा गेली. काय त्यांची स्वप्न. ४०० पार जागा म्हणजे काय फर्निचरचं दुकान आहे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.पुढे उद्धव ठाकरे म्हणाले की, 'कोणीही राज्यकर्ता अमर पट्टा घेऊन येत नाही. या देशाच्या जनतेसमोर हुकूमशाही कितीही मोठी असला, ज्यावेळेस सर्व लोक एकवटात त्यावेळी हुकूमशहाचा अंत होतो. आज ती वेळ आलेली आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. आपला इतिहास थोडा फोडा आणि



राज्य करा असा असेल, त्यामुळे आपल्या मध्ये जो फूट पाडतोय त्याला थोडा आणि त्याच्या छाताडावर राज्य करा अशी सांगायची वेळ आलेली आहे.''तेजस्वी यादव यांनी जसा नारा दिला तसा मी देखील एक नारा या सभेत देतो. ते म्हणतात आपकी बार, मी म्हणतो आपकी बार भाजपा पार आणि याची सुरवात आजपासून झालेली आहे. मला मला खात्री आहे शिवाजी पार्क वरून जेव्हा रणशिंग फुकले जातात, मशाल हातात घेऊन आपल्याला रणशिंग महाराष्ट्रभर फुंकायचे आहे. मुंबईतून जेव्हा एखादी गोष्ट बोलली जाते तेव्हा संपूर्ण देश त्या वाटेवरून चालतो', असंही उद्धव ठाकरे म्हणाले.उद्धव ठाकरे म्हणाले की, आजपासून लोकशाही रक्षणाची सुरुवात होत आहे. मी त्या हुकूमशहांना सांगतोय, तुम्हाला असे वाटत असेल ज्यांना ज्यांना घाबरून तुम्ही पक्षात घेत आहात, ती म्हणजे देशाची जनता नाही. देशाची जनता माझ्यासमोर बसली आहे. जनता आमच्या सोबत आहे. तुम्ही कितीही अत्याचार करण्याचा प्रयत्न करा, तुम्हाला तोडून मोडून टाकल्याशिवाय राहणार नाही, ही शपथ घेऊन आम्ही मैदानात उतरलो आहोत. आपकी बार भाजपा तडीपार हा नारा घेऊन गावागावात जा आणि या हुकूमशाही राजवटीचा अंत करा, असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं आहे.

## मराठी भाषा गौरव दिन,महिला दिन व मतदार जनजागृती अभियाना निमित्याने भव्य काव्यमैफिलीचे आयोजन

**जिंतूर । प्रतिनिधी**

१७ मार्च २०२४ रोजी तहसील कार्यालय आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालय जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने काव्यानंद .....एक दिवस कवितेचा हा कार्यक्रम आणि निवृत्त मेजर डॉ. राहुल आंबेगावकर यांचे आरोग्य व्याख्यान राधाकृष्ण मंगल कार्यालय जिंतूर येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून काव्यात्मक आनंदातुन मतदान जनजागृती आणि सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राजेश सरवदे तहसीलदार, त्र्यंबक पोले गटशिक्षणाधिकारी आणि आरोग्य व्याख्याते निवृत्त मेजर डॉ. राहुल आंबेगावकर हे उपस्थित होते.

कवी संमेलनामध्ये त्र्यंबक पोले, तुकाराम चव्हाण, शंकर दांडगे, रत्नाकर जोशी, दत्तराव पोले, महेश देशमुख, शंकर माने, मयूर जोशी, गौतम खिल्लारे, भास्कर चव्हाण, लक्ष्मण चिमले, श्रीमंत दिपके, माधव खुडे, वामन राठोड, राजेंद्र ढाकणे, नामदेव सानप, श्रीमती सुनिता मगर, उमेश तायडे, अशोक मुसळे, परमेश्वर वाकळे, राजु वाकळे या कवींनी सहभाग नोंदवून आपल्या बहारदार कवितेने लोकांच्या मनामध्ये मतदान जनजागृतीसह अनेक विषयावर समाज प्रबोधन केले. याच कार्यक्रमात कांबळे यांनी स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरित्रावर थरारक पोवाडा सादर केला, तर बाळू बुधवंत यांनी संतोष नारायणकर यांची एक कविता सादर केली. सोपान खताळ, डोईफोडे, दायमा यांनी मतदान प्रक्रिया, एतच् मशीन (उण, इण, ततझ-ढ) याविषयी मार्गदर्शन करून, शंका समाधान केले.आरोग्य व्याख्याते निवृत्त मेजर डॉ. राहुल आंबेगावकर यांनी आपल्या व्याख्यानात मधुमेहाविषयी सविस्तर माहिती सांगितली. संतुलित आहाराचे महत्त्व, बदलत्या आणि आजच्या धकाधकीच्या कार्यशैलीमध्ये व्यायामाचे महत्त्व समजावून सांगितले. बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे आजार आणि त्यावरील उपाय याविषयीही सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुक्याचे उपक्रमशील गटशिक्षणाधिकारी त्र्यंबकजी पोले यांनी केले. तहसीलदार राजेश सरवदे साहेब यांनी मतदान जनजागृती तसेच साहित्य जगण्याला दिशा देते विषयावर मार्गदर्शन केले काव्यमैफिलीचे बहारदार निवेदन कवी, गझलकार मयूर जोशी यांनी केले. कार्यक्रमाला तालुक्यातील बहुसंख्य शिक्षक, विद्यार्थी व नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी ,गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी ,सर्व मुख्याध्यापक ,शिक्षक यांनी मोलाचे सहकार्य केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .